स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ... जावक 3403 तारीख 6-6-84 कोल्हापूर

महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी३५८३/७७४३/विशि-२
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक :- 30 मे, १९८४

प्रति,

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ, मुंबई,
पुणे विद्यापीठ, पुणे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

विषय :- १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत...

महोदय,

१९८४-८५ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे विद्यापीठांकडून आलेल्या अर्जाचा विचार करून सोबतच्या यादीमध्ये दिलेल्या संस्थाकडून १९८४-८५ पासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९७४ च्या कलम ४३[४]व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची संबंधित विद्यापीठांना परवानगी देण्याचे शासनाचे ठरविले आहे.

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे :-

१. शासनाकडून वर निर्देशित केलेल्या महाविद्यालयांना ३ वर्षापर्यंत कुठलेही अनुदान देण्यात येणार नाही.
२. ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परिक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला[आदिवासी क्षेत्रातील महाविद्यालयांकरिता ही विद्यार्थी संख्या कमीत कमी ३० अशी आहे]तरच तो वर्ग १९८४-८५ पासून सुरु करावा तसेच १९८४-८५ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणाऱ्या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परिक्षेत कमीत कमी ३० विद्यार्थी बसले पाहिजेत. (आदिवासी विभागातील

...२/-

ऑ. ... 6-6-84
स्वतंत्र फाईल ...

COM. & SCIENCE CO... Loni Kalbhor

महाविद्यालयात कमीत कमी २२.]

३. १९८४–८५ हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याकरिता थोडा कालावधी असल्यामुळे विद्यापीठांना अशी विनंती करण्यात येत आहे की, या संस्थांना ही महाविद्यालये १९८४–८५ पासून सुरु करण्यास परवानगी द्यावी. स्थानिक चौकशी समिती, ॲकॅडमिक कौन्सिल, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठांकडून शासनाकडे प्राप्त झाल्यावर कलम ४३[६]व[७] यानुसार अंतिम संलग्निकरणाचे आदेश काढण्यास शासनाची हरकत नसेल असे गृहित धरण्यात यावे.

४. विद्यापीठांना असेही कळविण्यात येत आहे की, संबंधित संस्थांना महाविद्यालये सुरु करण्याची परवानगी देतांना त्या संस्थांना विद्यापीठाने असे निःसंदिग्धपणे कळवावे की, प्रवेश संख्या तात्पुरत्या स्वरुपात देवून जर ४० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयाला पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण, ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील अन्यथा महाविद्यालयांना संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ४३ [६]व [७]अनुसार संलग्नीकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. पत्राची प्रतिलिपी संबंधित व्यवस्थापनांकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[डी. डी. सोहिजवाला]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत सर्व संस्थाचे व्यवस्थापन यांस पाठविण्यात येत आहे. संस्थांना महाविद्यालय उघडण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद २ व ४ मधील अटीवरच देण्यात आलेली आहे.

प्रतिलिपी

शिक्षण संचालक[उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे

विभागीय [illegible] अधिकारी[उच्च शिक्षण]मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर [illegible] पाठविण्यात येत आहे.

TRUE COPY
Principal
S.G.K. College, Loni Kalbhor

TRUE COPY
Principal
S.G.K. College, Loni Kalbhor

True Copy
Librarian
S. G. K. College,
Lonikalbhor, (Pune)

शासन पत्र शिक्षण व सेवा योजना विभाग क्र. एनजीसी ३५८३/
७७४३/ विशि-२, दिनांक ३० मे १९८४ चे सहपत्र.

## विवरणपत्र

१९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता तीन वर्षे विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या महाविद्यालयांची यादी.

| नवीन महाविद्यालय उघडण्याचे ठिकाण | विद्याशाखा | ज्या संस्थेस महाविद्यालय उघडण्याची परवानगी दिली आहे त्या संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | **मुंबई विद्यापीठ** | |
| १) गोरेगांव(पश्चिम), मुंबई (जवाहर नगर). | कला, विज्ञान व वाणिज्य | मास्टर तारासिंग फाऊंडेशन ट्रस्ट, मुंबई. |
| २) वाशी, नवी मुंबई. | कला, विज्ञान व वाणिज्य | इंडियन कल्चर लिग, मुंबई. |
| ३) मोखाडा, जिल्हा ठाणे | कला, विज्ञान व वाणिज्य. | रयत शिक्षण संस्था, सातारा. |
| ४) कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग | कला व वाणिज्य | कराची महाराष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळ, मुंबई. |
| | **पुणे विद्यापीठ** | |
| ५) पुणे | वाणिज्य | दि पुना गुजराथी केळवणी मंडळ, १४३३/३४ कसबा पेठ, पुणे. |
| ६) पुणे | कला, विज्ञान व वाणिज्य. | श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ४२५, शुक्रवारपेठ, पुणे. |
| ७) पुणे. | कला व वाणिज्य | दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया, पुणे. |
| ८) कळंब, वालचंदनगर, जिल्हा पुणे. | कला व वाणिज्य. | इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान शिअगांव वेसकी, ता. इंदापूर, जि. पुणे. |
| ९) बेल्हे, ता. जुन्नर, जिल्हा पुणे | कला, विज्ञान व वाणिज्य. | रयत शिक्षण संस्था, सातारा. |
| १०) लोणी काळभोर ता. हवेली, जिल्हा पुणे. | कला, विज्ञान व वाणिज्य. | श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर. |

... २

True Copy
Librarian
S. G. K. College,
Lonikalbhor, (Pune)

TRUE COPY
Principal
S.G.K. College, Loni Kalbhor

Scanned by CamScanner

| १ | २ | ३ |
| --- | --- | --- |
| ) बामपुर, जिल्हा नाशिक. | कला, विज्ञान व वाणिज्य. | एम.जी. विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प. |
| १२) राहाता जिल्हा अहमदनगर. | कला व वाणिज्य | जिजामाता एज्युकेशन सोसायटी, राहाता, जिल्हा अहमदनगर. |
| | **शिवाजी विद्यापीठ.** | |
| १३) कागल, जि. कोल्हापूर. | कला व वाणिज्य. | दि कागल एज्युकेशन सोसायटी, कागल जिल्हा कोल्हापूर. |
| १४) कासेगांव, ता. वाळवा जिल्हा सांगली. | कला, विज्ञान व वाणिज्य. | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, कासेगांव, जिल्हा सांगली. |
| | **मराठवाडा विद्यापीठ** | |
| १५) परतुर, जिल्हा जालना | कला व वाणिज्य. | मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ, परतुर |
| १६) नायगांव, जिल्हा नांदेड | कला, विज्ञान व वाणिज्य. | एज्युकेशन सोसायटी, नायगांव जिल्हा नांदेड. |

True Copy

प्राचार्य,
एस.जी.के. आर्टस, कॉमर्स अँड सायन्स
कॉलेज लोणी-काळभोर (पुणे)

TRUE COPY

Principal
S.G.K. College, Loni Kalbhor

Scanned by CamScanner